PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 5

# "जी.एस.टी. ऐतिहासिक विधेयक"

**प्रा. रमेश काशिराम शेंडे**
मातोश्री मुंदाफळे समाजकार्य महा.
नरखेड, जि. नागपूर
**महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना :–**

दि. ३ ऑगस्ट २०१६ रोजी अंतिमतः बहुप्रतीक्षित व बहुचर्चित वस्तू व सेवाकर विधेयकाला राज्यसभेची मंजूरी मिळाली. लोकसभेची मंजूरी अगोदरच्या मसुद्याला मिळाली होती. त्यामुळे हा नवा मसुदा पुन्हा तांत्रिकदृष्टया लोकसभेत मंजूरीसाठी मांडला जाईल. नंतर तो राज्य सरकारांकडे पाठविला जाईल. किमान पन्नास टक्के राज्य विधानसभांची मंजुरी आवश्यक आहे. तसेच सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांनी मिळून वस्तू सेवा कर परिषद गठित करावी लागेल. केंद्र सरकारासहित प्रत्येक राज्याला संसदमान्य कायद्यानुसार आपला स्वतःचा कायदा पारित करून त्याच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र खाते सुरू करावे लागेल. त्या प्रक्रिया पार पाडून हा कायदा १ एप्रिल २०१७ लागू व्हावा असा अंदाज आहे.

हा कर पारित होणे ही स्वतंत्र भारताच्या कर इतिहासातील अत्यंत महत्वाची घटना मानली जाते.

**वस्तू सेवा कराचे स्वरूप :–**

भारताच्या कर रचनेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या आर्थिक व्यवहारांवर केंद्र सरकार कर लावते. जे आर्थिक व्यवहार केवळ राज्यपुरते मर्यादित असतात. त्यावर राज्य सरकार कर लावतात. ही यादी संविधानात समाविष्ट असते. राज्य सरकारांनी स्वतःच्या खात्यातील व्यवहारांवर कोणत्या दराने कर लावावे, त्याचे स्वातंत्र्य त्यांना आहे. त्यालाच त्यांची कर स्वायत्तता म्हटले जाते. त्या कमी–जास्त दरामुळे उद्योजक आपले उद्योग व्यापार नफावर्धक राज्यांमध्ये स्थापित करतात. एकमेकांच्या स्पर्धेत करांचे दर कमी ठेवणाऱ्या राज्यांचा कर महसूल अंतिमतः कमी होतो विकास कार्यांकरिता अशा सरकारांचे अर्थसंकल्प तूटीचे होतात. (खर्च जास्त–महसूल कमी) व त्यांना कर्जे काढावी लागतात. वाजपेयी सरकारच्या कार्यकाळात 'राजकोषी जबाबदारी व कर्ज व्यवस्थापन कायदा (२००३) पारित झाला. त्या अंतर्गत केंद्र व राज्य सरकारांच्या कर धोरणांमध्ये असलेली क्लिष्टता कमी करण्याची गरज प्रकर्षाने जाणवली. त्यावर उपाय म्हणून शुल्क, विक्रीकर, शास्त्रांमध्ये येणाऱ्या वस्तूंवर लावणारे ऑक्ट्राय (प्रवेश कर), अशा करांवर लावले जाणारे विविध राज्यांमधील विविध दरांचे अधिभार, विविध राज्यांमध्ये विविध वस्तुंना दिली जाणारी कर सूट इत्यादी १३–१४ कायद्यांमुळे उत्पादकांना देशभरात व्यापार करतांना दरांची अनिश्चिता प्रत्येक ठिकाणी कर भरतांना लागणाऱ्या वेळामुळे (कच्छ ते आसाम यास नेपाळच्या ट्रकला प्रत्यक्ष प्रवास वेळेपेक्षा कर भरण्यास ठिकठिकाणच्या पोलिस चौकशीस उत्तर देत आठ तास अधिकचे लागले तर त्यामुळे ड्रायव्हर, कंडक्टरच्या एक दिवसाच्या पगाराइतका वाढणारा खर्च उद्योजक व्यापारी भरतात, पण शेवटी ग्राहकांवर

ढकलून देतात. हे सगळे टाळून करपद्धतीत पारदर्शकता आणणे जिकिरीचे होते. वस्तुंचे कर राज्यांच्या आधीन होते तर विमा बँकिंग, विमान वाहतूक, टेलिकॉम इत्यादी सेवावरील कर केंद्र सरकारच्या आधीन, अशा गुंतागुंतीने सुलभ व पारदर्शी कर समायोजन करणेही आवश्यक होते. त्याची प्रशासकीय चाचपणी सुरू झाली व राज्यांचा वस्तू कर वस्तूंच्या मुल्याच्या ७ टक्के व केंद्रिय कर ५२ टक्के असा एकूण १२ टक्केंचा एकच कर देशभर असावा, असे मत पडले तोपर्यंत (२००४ मध्ये) कंद्रात वाजपेयी सरकार जाऊन मनमोहन सिंग सरकार आले होते. त्या सरकारने एप्रिल १, २०१५ पासून असा कर लावण्याचा प्रस्ताव मांडला. परंतु भाजपच्या (विशेषतः गुजरात) राज्य सरकारांनी स्वतःची स्वायत्तता नष्ट होते, म्हणुन विरोध केला. नंतर संपुआ सरकार त्या कायद्याच्या मसुद्यात दुरूस्त्या करीत राहिले व २०११ मध्ये ते विधेयक मांडले गेले. परंतु विरोधी दलांनी पुन्हा ते मागे पाडले. २०१४ मध्ये केंद्रात भाजपप्रणित सरकार आल्यानंतर त्या विषयाचे महत्व लक्षात येऊन त्या कायद्याच्या मसुद्यात बदल करून ते विधेयक पारित होण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू झाले. अनेक राज्यांचे करांचे दर २४—२६ टक्केपर्यंतही असल्यामुळे सरासरी दर १८ टक्के असावा असे प्रस्तावित केले होते. त्यामागे हेतू हाही होता की जास्त दर असणाऱ्या राज्यांचा तोटा कमी व्हावा व काही रक्कम शिल्लक उरेल त्यातून ज्या राज्यांचे महसूल नुकसान होणार असेल ते भरून काढावे.

**हे विधेयक पारित होण्याआधी काँग्रेस पक्ष व विरोधी पक्षांच्या विरोधाचे तीन महत्वाचे मुद्दे होते ते असे.**

१) राज्यांचे वस्तू कर दर जास्त असल्यामुळे त्यांना नुकसान होणार आहे. ते पाच वर्षेपर्यंत पूर्णपणे केंद्र सरकारने भरून द्यावे.

२) आंतर राज्य व्यापारावर (एनडीए सरकारने अतिरीक्त 1 टक्का कर प्रस्तावित केला होता, तो रद्द करावा आणि ग्राहकांच्या संरक्षणार्थ, वस्तू सेवा कराचा महत्तम दर १८ टक्केपेक्षा अधिक असणार नाही, असे कायद्यातच नमूद केले जावे.

वरीलपैकी दोन सूचना मान्य केल्या गेल्या तिसरी सूचना विचाराधीन राहील, असे म्हटल्यानंतर काँग्रेस व इतर विरोधी पक्षांनी आपली सहकार्याची तयारी दर्शविली आणि त्यामुळे ज्या राज्यसभेत भाजपा सरकारला बहुमत नाही. तिथेही वस्तू सेवा कर विधेयक पारित झाले. हा भारतीय लोकशाहीचा ऐतिहासिक विजय मानला जात आहे. पारित झालेल्या विधेयकात कमाल दराचार उल्लेख नाही. म्हणून काँग्रेसचे माजी वित्तमंत्री चिंदबरम यांनी म्हटले आहे की, प्रशासकीय पुर्तता करून तीन महिन्यानंतर अंतिम विधेयक सादर करतांना १८ टक्के ह्या दराचा समावेश असावा.

**संशोधनपद्धती :—**

कोणत्याही विषयाचे संशोधन वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून संशोधन पद्धतीचा अवलंब करून संशोधन केले जाते. प्रस्तुत शोधनिबंधासाठी ''जी.एस.टी. ऐतिहासिक विधेयक'' या विषयाची निवड केलेली आहे.

**उद्देश :—**

१) वस्तू व सेवा कर हा अप्रत्यक्ष कर असून त्याची सर्वात मोठी मर्यादा असल्याची माहिती जाणून घेणे.

२) उद्योजकांचा फायदा आणि सामान्यावर भार असी स्थिती असण्याबाबत अध्ययन करणे.

३) सर्व व्यवहार इलेक्ट्रानिक, ऑनलाईन पद्धतीने होणार असल्यामुळे पारदर्शक व्यवहार जलदगतीने होण्याबाबत माहिती जाणून घेणे.

४) राज्याचे वस्तू कर दर जास्त असल्यामुळे त्यांचे नुकसानाबाबत अध्ययन करणे.

**गृहितके :–**

१) सरकार वस्तू सेवा कराचा दर जेवढा कमी ठेवू शकेल तेवढेच सामान्य मानसाचे कल्याण वाढेल.

२) उद्योजकांचा फायदा आणि सामाण्यावर भार असी स्थिती होऊ शकते.

३) राज्याचे वस्तू कर दर जास्त असल्यामुळे त्यांचे नुकसान होणार आहे.

४) सर्व व्यवहार इलेक्ट्रानिक, ऑनलाईन पद्धतीने होणार असल्यामुळे पारदर्शक व्यवहार जलद गतीने होतील.

५) भारतात इतर देशापेक्षा गरिबी दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्यामुळे जागतिक तुलनेत हा दर म्हणजे एक प्रकारचा आधार आहे.

**नमुना निवड :–**

प्रस्तुत शोधनिबंधात गैर सभाव्यता नमुना निवड पद्धती सोईस्कर नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला.

**संशोधनाचा आराखडा :–**

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकानी अंशतः वर्णनात्मक व अंशतः निदानात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन :–**

प्रस्तुत शोधनिबंधात तथ्य संकलनामध्ये प्राथमिक स्त्रोतामधील मुलाखत अनुसूची व निरिक्षण या तंत्राचा वापर करून दुय्यम स्त्रोतामध्ये वर्तमान पत्रे, लोकार्पण, मासिके, योजना, पुस्तके, शासकीय बुकलेट, इत्यादी तंत्राचा वापर करण्यात आला.

**जि.एस.टी. ची मर्यादा–लाभ :–**

१) देशभर वस्तू आणि सेवांच्या खरेदी–विक्रीवर एकाच दराने कर आकारणी असल्यामुळे उद्योजक–व्यापाऱ्यांकरिता संपूर्ण (खंडप्राय) देश हा एकच बाजार होणार आहे. की निश्चित झाल्यामुळे अनेक नवे उत्पादक दूरच्या राज्यांतील बाजारात सहज प्रवेश करू शकतात. त्यामुळे स्पर्धा व उत्पादन वाढण्यास प्रोत्साहन मिळेल. आर्थिक एकात्मतेद्वारा सामाजिक सांस्कृतिक, राजकीय एकात्मतेस मदत होऊ शकते. अंदाज असा आहे की, १२–१४ प्रकारच्या करांची क्लिष्टता कमी होऊन एकच कर सुलभतेने लावल्यामुळे राष्ट्रीय उत्पादनात १ ते १५ टक्क्यांची भर पडेल.

२) सगळे व्यवहार इव्हेक्ट्रॉनिक ऑनलाईन पद्धतीने होणार असल्यामुळे पारदर्शक व्यवहार जलद गतीने होतील.

३) राज्यांची आपसातील कर कमी करण्याची स्पर्धा संपुष्टात आल्याने काहीच राज्य किंवा शहरे विकासाची केंद्र न बनता औद्योगीकरण हे अधिक विकेंद्रीत होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होणार आहे.

४) केंद्र व राज्य सरकारे मिळून वस्तू–सेवा करांचे प्रशासन, त्यासाठी स्थापन होणाऱ्या परिषदेमार्फत चालणार असल्यामुळे केंद्र व राज्ये यांच्यामध्ये नव्या प्रकारचे संहकार्य भागीदारी व सामूहिक जबाबदारी निर्माण होणार आहे. यातून कदाचित भारतीय लोकशाहीचा पोत सुधारू शकतो. राज्यांमधील आपसांतील विकासाची स्पर्धा यापुढे करांच्या दरांद्वारे न होता इतर सक्षमता नियोजन, मानवीय धोरणे इत्यादींद्वारा होईल.

५) शेवटच्या उपभोक्याचा आधी कच्च्या मालाच्या उत्पादन विक्रेत्यापासून पक्का माल तयार करणारे व ठोक व्यापाऱ्यापासून चिल्लर व्यापाऱ्यापर्यंत सगळे वस्तू सेवा कर भरणार आहेत. पण त्यांनी खरेदीच्या वेळी भरलेला कर विक्रीच्या रकमेतून परत मिळणार आहे व शेवटचा चिल्लर व्यापारी खरेदीच्या वेळी भरलेला कर अंतिम ग्राहकाकडून वसूल करील. त्यामुळे करावर कर होणार नाही. पण सगळयांच्या व्यवहारांचा हिशेब राहणार असल्यामुळे करचोरी शुन्यावर येऊन सगळयाच सरकारांचे उत्पन्न वाढेल व कर्जबाजारीपणा कमी होईल.

६) वस्तु व सेवा कर हा अप्रत्यक्ष कर आहे. हीच त्याची सर्वात मोठी मर्यादा आहे. आयकर संपत्ती कर इत्यादी प्रत्यक्षपणे सरकारद्वारे व्यक्तीवर आकारले जातात व ती व्यक्ती ती रक्कम सरकारमध्ये भरते. कमी जास्त उत्पन्नाप्रमाणे ती रक्कम बदलते. श्रीमंताकडून अधिक दराने रक्कम घेऊन त्या करांना पुरोगामी कर म्हटले जाते. पण उत्पादन कर विक्रीकर इत्यादी कर एकावर (उत्पादक किंवा व्यापारी) आकारले जातात. पण किमंत वाढवून त्यांचा आघात उपभोक्त्यांवर पडतो. म्हणजे उपभोक्त असे कर अप्रत्यक्षपणे भरत असतात. आईस्क्रीमवरील कर श्रिमंत आणि गरीब हे सारखेच रकमेचा भरतात. परंतु गरिबांचे उत्पन्न कमी असल्यामुळे त्याच्या उत्पन्नावर भार अधिक पडतो. म्हणून त्याला प्रतिगामी कर म्हटले जाते. या कारणाकरिता चिंदबरम यांनी म्हटले आहे की कॉंग्रेसचा आग्रह महत्तम दर संविधानात लिहिण्यावर आहे. अन्यथा उद्योजकांचा फायदा आणि सामान्यांवर भार अशी स्थिती होऊ शकते.

७) आज सरकार जो १८ किंवा २० टक्के पर्यंतचा दर प्रस्तावित करीत आहे. तो जगातील विकसित व विकसनशील देशांच्या सरकारी अनुक्रमे १६.५ व १४.५ टक्के दरांपेक्षा अधिक असणार आहे. भारतात इतर देशापेक्षा गरिबी रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्यामुळे जागतिक तुलनेत हा दर म्हणजे एकप्रकारे आघातच आहे. त्यामुळे सरकार वस्तू सेवा कराचा दर जेवढा कमी ठेऊ शकेल तेवढे सामान्य माणसाचे कल्याण वाढेल.

**जी.एस.टी. चा सर्वाधिक फायदा ग्राहकाला :–**

वस्तू व सेवा कराचा (जी.एस.टी.) सर्वाधिक फायदा ग्राहकालाच होणार असून व्यवस्थेत एक पारदर्शकता येणार आहे. शिवाय, गरिबी दूर होण्यास मदत होणार आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत बोलतांना सांगितले.

भाजप सरकारचे बहुप्रतीक्षित जीएसटी विधेयक राज्यसभेत मंजूर झाल्याप्रकरणी मोदींनी लोकसभेत सर्वपक्षीयांचे आभार मानले यावेळी बोलतांना ते म्हणाले, 'जीएसटी' म्हणजे केवळ करव्यवस्था नसून 'एक भारत' या भावनेला बळ देणारी व्यवस्था आहे. व्यवस्थेत एक प्रकारचा विश्वास निर्माण होईल आणि अर्थव्यवस्थेला गती मिळेल. 'जीएसटी' म्हणजे एका पक्षाचा नाही तर हा लोकशाहीचा विजय आहे. याचा सर्वाधिक फायदा ग्राहकाला होईल. राज्यांनी 'जीएसटी' विधेयकाला मंजूरी देणे गरजेचे आहे. जीएसटी मंजूर होणे म्हणजे भारतातल्या लोकशाहीचा विजय आहे.

गरीबांना जीएसटीचा फायदा सर्वाधिक होणार आहे. गरीबांना आवश्यक असणाऱ्या कोणत्याच गोष्टींवर कर बसणार नाही. खाद्यपदार्थ व औषधांना जीएसटी लागू होणार नाही. गरीब जनतेला आर्थिक आणि शैक्षणिकदृष्टया सक्षम करणे आमचा मूळ उद्देश असून जीएसटीमुळे तो हेतू साध्य करण्यात मदत होईल. जीएसटीमुळे छोटया–छोटया व्यापाऱ्यांना देखील फायदा होणार आहे. प्रत्येक व्यक्तीला आर्थिक व्यवहारासंबंधी माहिती मिळणार आणि त्याचा सामान्य फायदामुळे देशातले रोजगार वाढतील.

**जीएसटी दर २० टक्क्यांच्या खाली असावा :–**

प्रस्तावित वस्तू आणि सेवा कराचा दर २० टक्क्यांहून अधिक असल्यास महागाई वाढविण्याची शक्यता आहे. त्यामुळे जीएसटी दर २० टक्क्यांखाली असावा, अशी मागणी उद्योगजगताने केली आहे.

जीएसटी विधेयकला राज्यसभेने मंजूरी दिली असून लोकसभेतही सुधारीत विधेयक मंजूर होईल. त्यामुळे एप्रिलपासून ही कर प्रणाली लागू करण्याचा केंद्र सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र जीएसटी २० टक्क्यांपेक्षा कमी असावा अशी उद्योगांची आग्रही

मागणी आहे. कर महसूल वाढण्याची हमी नाही तो पर्यंत कर सुधारणा यशस्वी झाली असे म्हणता येत नाही. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारचे महसुली तटस्थता दर (आरएनआर) ठरवितांना चौफेर विचार झाला पाहिजे असे मत उद्योगाची शिखर संघटना असलेल्या असोचेमचे महासचिव डी.एस. रावत यांनी व्यक्त केले. जीएसटीचा किमान दर १७ ते २० टक्क्यांदरम्यान राहील, असा अंदाज आहे. मात्र त्यापेक्षाही जास्त असल्यास महागाईला कारणीभूत ठरेल. सेवा क्षेत्राला मोठी झळ बसेल.

जीएसटीची अंमलबजावणी करण्यास अद्याप सात महिन्यांचा कालावधी आहे. जीएसटीमुळे राज्यांचे होणारे नुकसान तसेच उद्योगांची मते जाणुन त्यानुसार त्याचा आराखडा तयार करण्यास सरकारकडे पुरेसा वेळ आहे. यामुळे जीएसटीची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल, असे त्यांनी सांगितले. महांगाईचा आढावा घेत असतांना जीएसटीमध्ये दूरसंचार, बँकींग, आरोग्य आणि रेल्वे या सेवांना प्राधान्यक्रम देण्याची मागणी औद्योगिक संघटनांनी केली आहे. जीएसटीचा आरएनआर दर १७ ते १८ टक्क्यांच्या दरम्यान राहील. अशी शक्यता जाणकरांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**<u>'जीएसटी' ने वाढणार महागाई, रोजगाराला फटका :–</u>**

अनेक वर्षांच्या अनिश्चितेनंतर वस्तू व सेवाकर (जीएसटी) विधेयक मंजूर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या मंजुरीनंतर जीएसटी विधेयक पुढील वर्षी १ एप्रिलपासून अंमलात येणार आहे. 'जीएसटी' साठी मोदी सरकार आग्रही होत पण काँग्रेसच्या विरोधामुळे हे विधेयक रखडले होते. बुधवारी राज्यसभेत २०३ मतांनी हे विधेयक मंजूर झाले मात्र महागाई आणि रोजगाराला फटका बसणार असल्याचे बोलले जात आहे.

या विधेयकाला मंजूरी मिळाल्यामुळे संपूर्ण देशात एकच करपद्धती लागू होणार आहे. संसदेच्या मान्यतेनंतर २९ पैकी अर्ध्या राज्यांची मंजूरी मिळाली की अंमलबजावणीचा मार्ग मोकळा होणार आहे. अर्थात, अर्ध्यापेक्षा जास्त राज्ये जीएसटीला मंजूरी देतील हे स्पष्ट असल्यामुळे हा मुद्दा आडकाठी ठरणार नाही. जीएसटी कराचा दर किती असेल ही अद्याप जाहीर केले नसले तरी तो १८ टक्के असेल असा अंदाज आहे. जीएसटी विधेयकामुळे वस्तू आणि सेवांच्या सुलभ देवाणघेवाण पारदर्शकता येणार देशाच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल. देशाच्या महसुली उत्पनात वाढ होणार असून सध्याचा देशाच्या आर्थिक विकासाचा दर पाच टक्के असून तो १२ टक्क्यांवर जाण्याची अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे.

देवाण–घेवाणीवर वॅट आणि सेवाकर लागणार नाही. घर खरेदी करण्यासाठी किंवा 'खरेदी–विक्री करण्यासाठी ज्या गोष्टींसाठी वॅट आणि सर्व्हिस टॅक्स लागतो. 'जीएसटी लागू झाल्यावर हा खर्च कमी होणार आहे. हॉटलिंग स्वस्त : रेस्टारंटचं बिल

यामुळे कमी होईल कारण आता वॅट आणि सहा टक्के सेवाकर लागतो. जीएसटी लागू झाल्यास केवळ एकच टॅक्स लागणार आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तू स्वस्त सध्या इलेक्ट्रानिक वस्तूवर १२.५ टक्के एक्साईज आणि १४.५ टक्के वॅट लागतो. जीएसटी लागू झाल्यावर १८ टक्के कर लागेल. तर चहा–काफी, डबा बंद प्रॉडक्ट, सर्व्हिसेस, मोबाईल/क्रेडिट कार्ड बिल, जेम्स आणि ज्वेलरी, रेडिमेट गारमेंट्सही महाग होऊ शकतात.

**जी.एस.टी. देशाचे आर्थिक एकत्रीकीकरणाची वाटचाल :–**

देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर झालेल्या आर्थिक बदलांमध्ये समाविष्ट असलेले 'जीएसटी' बिल गेल्या 3 ऑगस्टरोजी राज्यसभेत बहुमताने पारित झाले. लोकसभेची सहमती मिळाल्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अंतिम स्वरूप दिले जाणार आहे. देशाच्या कररचनेत सुधारणा करणाऱ्या 'जीएसटी' वर १ एप्रिल २०१७ पासून अंमलबजावणी होणार आहे. 'व्हल्यु ॲडेड टॅक्स' ला (व्हॅट) पर्याय असलेली या करप्रणालीचे देशातील सामान्यंपासून सरकारला फायदे मिळणार आहेत, याविषयी जनतेत उत्सुकता आहे.

वस्तु आणि सेवाकर विधेयकामुळे (जीएसटी) व्यावसायिकांप्रमाणेच सामान्य जनतेलाही याचा लाभ मिळणार आहे. कारण, यामुळे भविष्यात कर कमी होऊन अनेक वस्तु, सेवा स्वस्त होतील तसेच आर्थिक एकत्रिकरणाकडे देशाची वाटचाल होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. संपूर्णदेशात एकच वस्तू आणि सेवा कर अर्थात 'जीएसटी' लागू करणे ही भारतीय कर क्षेत्रातील सर्वात मोठी सुधारणा ठरणार आहे. मुळात 'जीएसटी' रचना पुरवठयावर आधारीत आहे. आतापर्यंत कराची रचना ही पुरवठयावर आधारीत असायची. मात्र, या विधयेकाने उत्पादन तेथूनच कररचना सुरू होणार. यापुर्वी प्रत्येक राज्यात परस्पर कर लावण्याची मुभा असायची. आता कर लावण्याआधी 'जीएसटी' कॉन्सिलच्या माध्यमातून कर लावण्यात येणार. यामुळे भारत संधटीत बाजारपेठ बनेल, वितरणव्यवस्था कळकट होईल, लॉजिस्टिक व्यवसायात क्रांती घडून येईल, जागतिक उलथापालथीचा लाभ मिळेल. विदेशी गुंतवणूक अधिक प्रमाणात आकर्षित होईल, पारदर्शक करप्रणाली संपूर्ण देशात लागू होईल, कार्यालयांत खेटे मारणे कमी होईल. विशेष म्हणजे 'जीएसटी' मुळे केंद्र व राज्य दोघांचाही महसूल वाढेल. ग्राहकांचा फायदा होईल आणि मुख्य म्हणजे मागास राज्यांतही परदेशी गुंतवणूक होईल.

**निष्कर्ष :–**

'जीएसटी' चा सर्वात मोठा लाभ प्रामुख्याने उत्पादन क्षेत्राला होईल. कारण आर्थिक व्यवस्था ही अधिक स्पर्धात्मक होणार आहे. उत्पादकाकडून वस्तू बनवली जाते, तेव्हा त्याला कच्च्या मालाची गरज भासते. म्हणजेच त्याला ती खरेदी करावी लागते. देशभरात एकच दराने तो खरेदी करू शकेल. 'जीएसटी' लागू झाल्याने करांमधील व्यापारांचे अडथळे दूर होणार. उपलब्ध स्त्रोतांचे चांगल्या प्रकारे वितरण होईल, पुरवठयामधील सर्व अडथळे दूर होतील, करभरणा पूर्तता वाढेल आणि याचा सर्वात महत्वाचा परिणाम

म्हणजे भारतावरील सर्वांचाच विश्वास वाढेल. 'जीएसटी' माहिती तंत्रज्ञान व्यासपीठाशी निगडीत राहणार असल्याने कराची रक्कम भरण्याच्या प्रक्रियेतही सुरळीतपणा येणार आहे. याचबरोबर देशभरातील मालाच्या वाहतुकीत कोणतेही अडथळे येणार नसल्यामुळे पुरवठा साखळीही कार्यक्षम होणार आहे. 1 एप्रिल २०१७ पासून 'जीएसटी' ची अमंलबजावणी होणार असल्याने व्यवहार व सौदा प्रक्रियेतील खर्च कमी होणार असून, 'जीडीपी' मध्ये दीड ते दोन टक्के वाढ होईल. 'जीएसटी' वर आधारीत सर्व व्यवउहार होणार असल्याने राज्यांना होणाऱ्या सर्व आर्थिक नुकसानाची पाच वर्षापर्यंत भरपाई देण्याची तरतूद 'जीएसटी' कौन्सिलमार्फत तंटा निवारण प्राधिकरण (डिस्प्युट रिझोल्युशन ॲथॉरिटी) स्थापना केल्याने पारदर्शकता राहणार असल्याचेही डॉ. देशपांडे यांनी स्पष्ट केले. यासोबतच ई—कॉमर्स क्षेत्रातील कंपन्यांना 'जीएसटी' चा सर्वाधिक फायदा मिळण्याची शक्यता आहे. किचकट करप्रणाली आणि विविध पातळयांवरील सरकारी व्यवस्थांमधून उद्योजकांची सुटका होईल.

'जीएसटी'मुळे अनेक व्यवसायांची कार्यक्षमता वाढेल. 'एखाद्या भागात कर कमी आहे म्हणून स्वस्तात मिळणारे तेथील उत्पादन घ्या' ही मानसिकता आता राहणार नाही. कराच्या दरात एकवाक्यता असल्याने उत्पादनाचा दर्जा आणि विक्रीपश्चात असल्याने उत्पादनाचा दर्जा आणि विक्रीपश्चात सेवा या दोन निकर्षावर कंपन्यांना स्पर्धा करावी लागेल. तसेच वार्षिक उलाढाल ५ लाखापेक्षा अधिक असलेल्या छोटया व्यावसायिकांना करावी लागणारी'व्हॅट नोंदणी' आता १० लाखांच्या पुढे गेल्यास करावी लागेल. म्हणजेच १० लाखापर्यंत वार्षिक उलाढाल असलेल्यांना 'जीएसटी' लागूच होणार नाही. त्यामुळे या व्यावसायिकांवरील कराचा भारसुद्धा कमी होणार. एकंदरित देशांच्या आर्थिक क्षेत्रातील क्रांतिकारक बदल म्हणून 'जीएसटी' चा आवर्जुन उल्लेख करावा लागतो.

## संदर्भसुची :—

१) डॉ. प्रदिप आगलावे ''सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे'' साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) बोधनकर/अलोणी ''सामाजिक संशोधन पद्धती'' साईनाथ प्रकाशन, नागपूर

३) लोकशाही वार्ता ''संवाद'' दि. ०७/०८/२०१६, पेज क्र. ०१, भाग — १, ''जीएसटी' विधेयक

४) लोकशाही वार्ता दि. ०१/०४/२०१६, पेज क्र. ०२, ''जीएसटी' चा सर्वाधिक फायदा ग्राहकाला.

५) लोकशाही वार्ता दि. ०१/०४/२०१६, पेज क्र. ०१, ''जीएसटी' ला लोकसभेची मंजूरी.

६) लोकशाही वार्ता दि. ११/०४/२०१६, पेज क्र. ०१, ''जीएसटी' चा दर २० टक्कांनी खाली असावा.

७) लोकशाही वार्ता दि. ०५/०८/२०१६, पेज क्र. ०२, ''जीएसटी' ने वाढणार महागाई रोजगाराला फटका.

८) लोकशाही वार्ता दि. ०७/०८/२०१६, पेज क्र. ०९, ''जीएसटी' आर्थिक एकत्रीकीकरणाकडे देशाची वाटचाल.